# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी - ५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

(विद्या विभाग)

एम.आ.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : academic.gug@gmail.com /academic.section@unigug.ac.in

जा.क्र./गो.वि./विद्या/ १२१४ /२०२५ दिनांक:- ०४/०९/२०२५

## अधिसुचना

**विषय :- शैक्षणिक सत्र २०२५-२६ करीता प्रवेश मुदत वाढीबाबत.**

**संदर्भ :-** १) विद्यापीठाचे अधिसुचना गों. वि./विद्या/ ८९१/२०२५ दिनांक ०९/०५/२०२५
२) विद्यापीठाची अधिसुचना गों.वि./विद्या/११३३/२०२५ दिनांक ०६/०८/२०२५
३) विद्यापीठाची अधिसुचना गों.वि./विद्या/११७३/२०२५ दिनांक २१/०८/२०२५

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये तथा संबंधितांना कळविण्यात येते कि, विद्यापीठाव्दारे निर्गमित करण्यात आलेली संदर्भीय अधिसुचना गों. वि./विद्या/८९१/२०२५ दिनांक ०९/०५/२०२५ नुसार विद्यापीठाचे पदव्युत्तर शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालयात सुरु असलेल्या विविध अभ्यासक्रमात प्रवेश घेण्याची अंतिम दिनांक ०४/०८/२०२५ देण्यात आली होती. तदनंतर महाविद्यालयाच्या मागणीनुसार सदर दिनांकात वाढ करुन संदर्भ क्रमांक २ व ३ नुसार दिनांक २१/०८/२०२५ तसेच दिनांक ०३/०९/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

परंतु अनेक विद्यार्थी विहीत तारखेपर्यंत महाविद्यालयात प्रवेश घेऊ शकले नाही व विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एकही विद्यार्थी प्रवेशापासुन वंचित राहु नये यासाठी सर्व प्रवेश पात्र विद्यार्थ्यांना मा. कुलगुरुंच्या परवानगीने **दिनांक १०/०९/२०२५** पर्यंत महाविद्यालयात **प्रवेश घेण्यास मुदतवाढ** देण्यात येत आहे. **यानंतर कोणत्याही परीस्थितीत प्रवेश घेण्यास मुदतवाढ देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.**

सदर मुदतवाढ ज्या अभ्यासक्रमाचे प्रवेश केंद्रीय प्रवेश समितीव्दारे केले जातात त्यांना लागु राहणार नाही. निर्धारीत प्रवेश क्षमतेमध्ये रिक्त जागी प्रवेश देण्यासाठी हि मुदतवाढ देण्यात येत आहे, याची नोंद घ्यावी.

मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशान्वये,

(डॉ. अनिल के. हिरेखण)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलीपी:-

१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांना उचित कार्यवाहीस्तव सादर.
४. पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.